नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०१४

निशाणी क्रमांक ४१ वरील आदेश

०१. दावा मिळकतीमध्ये नव्याने रस्ता करण्याच्या प्रयत्नात प्रतिवादी होते म्हणून वादींनी प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा निरंतर ताकिदीकरता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी या दाव्याचे समन्स व नोटीसा बजावून घेण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करुन दरम्यानचे काळात वाद मिळकतीमधून राजकीय हस्तक्षेप तसेच पोलीस बळाचा वापर करुन वादींची हरकत असताना नव्याने रस्ता जबरदस्तीने केला आहे व त्यामुळे दावा दाखल वेळेच्या परिस्थितीमध्ये अमुलाग्र बदल केला आहे. सदरचे दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप बदलत नाही व दाव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे वादीस प्रस्तुत अर्ज दाखल करुन दाव्यात दुरुस्ती करणे अनिवार्य झाले आहे. अर्जाचे पुष्टयर्थ वादी क्रमांक १ यांचे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

०२. निशाणी क्रमांक ४३ वर प्रतिवादी क्रमांक १ ते ३, ५ व ७ ते १० यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधून पोलीस बळाचा वापर करुन जबरदस्तीने वादीची हरकत न जुमानता कोणताही ४०० फूट लांबीचा व सुमारे १२ ते १३ फूट रुंदीचा नवा रस्ता कधीही केलेला नव्हता व नाही. तसेच प्रतिवादींनी वादींना दिनांक २.४.२०१४ रोजी तुरुंगात डांबणेची धमकी देखील दिलेली नाही. त्यामुळे वादीची जमीन पुर्ववत करुन मॅन्डेटरी ताकीद देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादींनी प्रस्तुत अर्जात मागणी केलेली दुरुस्तीची मागणी बेकायदेशीर

व चुकीची आहे.  तसेच वादीच्या मागणीप्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी दिल्यास मूळ दाव्याचे संपूर्ण स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा दावा दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०३.        प्रस्तुत दाव्यातील कथनांचा व प्रस्तुत अर्जातील दावा दुरुस्ती बाबतच्या मागण्यांचा बारकाईने विचार करता, असे स्पष्ट दिसून येते की, वादींचा सदरील दावा हा प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकिद मिळणेबाबतचा आहे. वादींच्या कथनांप्रमाणे दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादींनी केलेल्या बेकायदेशीर कृत्यामुळे वादींस प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांची न्यायचिकीत्सा होणेकरीता दोन्ही पक्षांच्या कथनांतील बाबींची सत्यता तपासणे गरजेचे आहे.  आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तत्वानुसार न्यायालयास वादी–प्रतिवादींच्या वादाचे मूळ कारणांची न्यायचिकीत्सा प्रकरणाच्या गुणवत्तेवरुन करता येईल व त्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर प्रकाश पाडण्यासाठी अशा प्रकारचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करता येईल. परंतू, अशा दुरुस्तीस मान्यता देताना दाव्याचे मूळ स्वरुप, प्रतिवादींचा बचाव या सर्व तत्वांना बाधा येता कामा नये.

०४.        वादींच्या कथनांनुसार दावा दाखल वेळेच्या परिस्थितीमध्ये प्रतिवादींनी दावा मिळकतीमधून नविन रस्ता तयार केल्यामुळे अमुलाग्र बदल झाला आहे. परिस्थिती बदलानुसार वादीस दाव्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. वादी यांनी मागणी केलेल्या सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे बचावास कोणतीही बाधा येणार नसून याउलट या दुरुस्तीमुळे दोन्ही पक्षातील वादाचे मूळ प्रश्न

निर्णीत करण्यासाठी आवश्यक ती मदतच होणार आहे. तसेच दाव्यांची गुंतागुंत देखील वाढणार नाही. सबब सदरील वादी यांनी प्रस्तावित केलेली दुरुस्ती न्याय्य आहे.

०५. सबब वर नमूद न्यायचिकीत्सेनुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये केलेली दावा दुरुस्तीची मागणी कॉस्टची रक्कम रुपये २००/– सरकार जमा करण्याचे अटीवर मंजूर करण्यात येते.

३. वादींनी सदरची दावा दुरुस्ती या आदेशाचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत करण्याची आहे.

सही/–

तासगांव. ( एस.एस.राऊत ),

दिनांक १४.१२.२०१५ सह–दिवाणी न्यायाधीश क.स्तर,तासगांव.